# होमगार्ड ऑनलाईन संगणक प्रणाली

**( USER GUIDE FOR DISTRICT POLICE HQ STAFF )**

१. प्रस्तावना :-

होमगार्ड विभागाचे संपुर्ण संगणकीकरण करण्याच्या उददेशाने मध्यवर्ती ऑनलाईन संगणक प्रणाली मा. महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य श्री. संजय पांडेय साहेब आणि उपमहासमादेशक श्री. प्रशांत बुरडे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तयार करणेत येत आहे.

सर्व होमगार्ड सदस्यांना रोटेशन पध्दतीने बंदोबस्त वाटप करणे, कर्तव्यावर उपस्थित होमगार्ड ची हजेरी ऑनलाईन पध्दतीने घेवून त्यानुसार कर्तव्य प्रमाणपत्र व विवरणपत्र त्वरीत तयार करणे. गैरहजर होमगार्ड सदस्यांवर कार्यवाही करणे, प्रशिक्षण शिबीरे व साप्ताहिक कवायत यांची नोंद घेणे. हा आहे.

सदर प्रणाली यशस्वीपणे राबविणेकरिता होमगार्ड ची पोलीस स्टेशन प्रमाणे मागणी लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रत्येक जिल्हा पोलीस मुख्यालयाने त्यांचेकडील बंदोबस्त मागणीपत्र ऑनलाईन भरणेची सुविधा उपलब्ध करणेत आली आहे. तसेच पोलीस स्टेशनला कर्तव्यावर उपस्थित झालेल्या होमगार्ड सदस्यांचा अहवाल पाहता येणार आहे. सदर सुविधेकरिता वापरकर्ता नोंदणी आवश्यक आहे. पोलीस मुख्यालयातील होमगार्ड बंदोबस्त संबंधित शाखेतील अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांचे स्वत:चे Username आणि Password अवगत करणेत ची प्रक्रीया खालीलप्रमाणे आहे.

अ. **पोलीस मुख्यालयातील कर्मचारी यांचेकरीता नोंदणी प्रक्रीया (Registration Process )**

१. प्रथम http://www.dnyanjyotisatara.in/hgmaha/login१.php या लिंक वर जावे.
२. त्यानंतर डाव्याबाजुला असणाऱ्या Login Panel मधील District HQ Police Login या ओळीवर क्लिक करावे.
३. त्यानंतर पोलीस मुख्यालय कर्मचारी/अधिकारी यांचे करिता असलेले Registration Page दृष्टीस येईल.
१. पोलीस कर्मचारी (वापरकर्ता ) यांची माहीती भरावयाची आहे. आपला Username आणि Password तयार करावयाचा आहे. कृपया आपला स्वत:कडे असणारा व नियमित चालू असणारा १० अंकी मोबाईल क्रमांक व्यवस्थित टाईप करावा. सदर क्रमांकावर आपणांस OTP प्राप्त होणार आहेत. जन्म दिनांक YYYY-MM-DD (वर्ष-महीना-दिवस) या फॉर्मेट मध्ये टाईप करा.

४. Submit बटन क्लिक केल्यावर आपली माहीती SAVE होईल. Login Page वर जाणेकरिता पेजच्या वरील बाजुस User Login Page वर जाणेकरिता Click Here या अक्षरावर क्लिक करावे. त्यानंतर पुन्हा Login पेज


५. आपण तयार केलेला Userid आणि Password टाईप करावा. Submit केल्यावर आपण नोंद केलेल्या मोबाईल क्रमांकावर OTP संदेश येईल त्यातील OTP टाईप करावा. Submit केल्यावर आपणांस होमगार्ड बंदोबस्त कर्तव्य मागणीपत्र , अहवाल अद्यावत करणेकरिता प्रवेश मिळेल.

६. आपला Username आणि Password लक्षात ठेवावा.

७. कृपया Online काम संपल्यावर Logout व्हावे.

८. अधिक माहिती करिता ९३५९६१६१९० या मोबाईल क्रमांकावर फोन करावा.

**होमगार्ड बंदोबस्त करिता रवाना करणेची Online करणेत येत आहे. सदर प्रक्रीया खालीलप्रमाणे असेल.**




- मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचेकडून बंदोबस्त करिता मागणी आल्यानंतर मा. महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य यांची होमगार्ड बंदोबस्त करिता तैनात करणेकरिता सर्व जिल्हा समादेशक यांना मंजुरी मिळते.

- मान्यता प्राप्त झाल्यानंतर होमगार्ड मुख्यालयातील प्रशासन शाखेकडून प्रणाली मध्ये बंदोबस्त तपशिल तयार केला जाईल.
- बंदोबस्त मंजुरी नंतर जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून पोलीस स्टेशन निहाय होमगार्ड संख्येचे मागणीपत्र (बटवडा) घेतले जाते. सदर मागणीपत्र जिल्हा पोलीस मुख्यालयातील बंदोबस्त संबंधित शाखेतील कर्मचारी यांनी Online भरावयाचे आहे.

  सदर ऑनलाईन मागणीपत्र जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे Login वर उपलब्ध करुन देणेत आले आहे. त्या संख्येप्रमाणे प्रमाणे जसा यापुर्वी बंदोबस्त पथक/उपपथकांकडून पोलीस स्टेशनला देणेकरिता बिनतारी संदेश तयार केला जायचा त्या प्रमाणे बटवडा तयार करुन संबंधित पोलीस स्टेशनला पथकप्रमाणे पुरुष व महीला उमेदवारांची संख्या बंदोबस्त करिता बोलविणेकरिता (Duty Allotment ) मध्ये भरावी. संख्या भरल्यानंतर कर्तव्याकरिता नियुक्त केलेल्या होमगार्डची यादी संबंधित पथक/उपपथकांना , पोलीस स्टेशनला , होमगार्ड सदस्यांना पाहणेकरिता संकेतस्थळाच्या मुख्य पानावर Login न करता व Registered Login केल्यानंतर जिल्हा होमगार्ड कार्यालय तसेच पोलीस स्टेशन पाहता येईल. सदर याद्या संगणक प्रणालीमध्ये रोटेशन पध्दतीने तयार होत आहेत. त्यामुळे निवडक व इच्छूक होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त मिळेलच असे नाही. तसेच कर्तव्याकरीता बोलविलेल्या होमगार्ड च्या नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर बंदोबस्त करिता हजर होणे बाबत संदेश पाठविला जाईल.

- पोलीस स्टेशनप्रमाणे याद्या संबंधित पोलीस स्टेशन ला उपलब्ध करुन दिलेल्या Login मध्ये होमगार्ड च्या संपुर्ण तपशिलासह उपलब्ध केल्या आहेत..तसेच बंदोबस्ताच्या पहील्या दिवशी कर्तव्यावर हजर होणाऱ्या होमगार्ड ची उपस्थिती नोंद पोलीस स्टेशनमधील बंदोबस्त उपस्थिती बाबत नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी Online करावयाची आहे.
- बंदोबस्त संपल्यानंतर जिल्हा होमगार्ड कार्यालयास सादर करावयाचे बंदोबस्त कर्तव्य प्रमाणपत्र (Duty Certificate) पोलीस स्टेशनमधील बंदोबस्त उपस्थिती बाबत नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी Online भरावयाचे आहे व त्याची प्रिंट काढून त्यावर पोलीस स्टेशन चे जबाबदार अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून जिल्हा कार्यालयास सत्वर पाठविणेत यावे.

जिल्हा पोलीस मुख्यालय स्तरावर बंदोबस्ताचा पोलीस स्टेशन निहाय बटवडा भरणेकरीता तसेच उपस्थिती अहवाल इ. पाहणेकरीता खालील Pages उपलब्ध केलेली आहेत.

**A. DUTY REQUISATION**

**१. DUTY DEMAND :-**

पोलीस स्टेशन प्रमाणे मागणी लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रत्येक जिल्हा पोलीस मुख्यालयाने त्यांचेकडील बंदोबस्त मागणीपत्र ऑनलाईन भरणेची सुविधा उपलब्ध करणेत आली आहे.

**२. Deployed HGs List :-**

या पेजवर कर्तव्याकरिता बोलविणेत आलेल्या होमगार्ड सदसयांची यादी पाहता येईल.

**३. HGs Duty Joining Report :-**

या पेजवर आपले कर्तव्य करिता दिलेल्या होमगार्ड पैकी संबंधित पोलीस ठाणेमध्ये कर्तव्यावर उपस्थित झालेल्या होमगार्ड ची पोलीस स्टेशन निहाय संख्या पाहता येणार आहे.

*******************